# तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी रत्नागिरी

यांचे कार्यालय, ता.जि. रत्नागिरी
पिनकोड:-415612 दुरध्वनी फोन:-02352 223127 **email :- tah_ratnagiri@rediffmail.com**

क्र.जबाबी-1/कावि 1798/2019 दि. 05/08/2019

प्रति,
श्री. सुभाष बाबल्या डोर्लेकर,
रा. गावडे आंबेरे, ता.जि.रत्नागिरी

विषय : स.नं. 114 हि.नं. 6/1 येथे अनधिकृतपणे झाडे तोडणेबाबत व स.नं. 114 हि.नं. 8/3 मध्ये विनापरवाना मातीचे उत्खनन करणेबाबत

महाशय,

मौजे गावडे आंबेरे, ता.जि. रत्नागिरी येथील स.नं. 114 हि.नं. 6/1 येथे अनधिकृतपणे झाडे तोडणेबाबत व स.नं. 114 हि.नं. 8/3 मध्ये विनापरवाना मातीचे उत्खनन करणेबाबत अर्जप्रकरणी मंडळ अधिकारी पावस यांचेमार्फत चौकशी करणेत आली आहे.

मौजे गावडे आंबेरे, ता.जि. रत्नागिरी येथील स.नं.114 हि.नं.6/1 मधील झाडे अनधिकृत तोडलेबाबत तक्रार केलेली आहे ती चुकीची आहे कारण तुम्ही नमुद केलेला पोटहिस्सा 6/1 हा मुळातच अस्तित्वात नाही त्यामुळे अस्तित्वात असलेला स.नं. 114 हि.नं. 6 मधील कब्जेदार श्री.विठ्ठल गंगाराम आंब्रे यांचा जबाब मंडळ अधिकारी पावस यांचेसमक्ष 05/07/2019 रोजी नोंदविण्यात आला आहे. त्यामध्ये त्यांनी अर्जदार यांचा हिस्सा नं. 6/1 या मिळकतीशी कोणताही हक्क संबंध नाही. त्यांचे नाव 7/12 मध्ये सामाईकात दाखल आहे. त्यांनी ठिकाणातील कोणत्याही झाडांची तोड केलेली नाही. सदर ठिकाणाची मंडळ अधिकारी यांनी पंचासमवेत पहाणी केली आहे.

तसेच तुम्ही गावडे आंबेरे ता.जि. रत्नागिरी येथील स.नं.114 हि.नं.8/3 या जमिनीतून विनापरवाना मातीचे उत्खनन केलेबाबत दुसरी तक्रार केली आहे. तुम्ही मंडळ अधिकारी पावस यांचेसमक्ष नोंदविलेल्या जबाबामध्ये स.नं. 114 हि.नं.8/3 मध्ये श्री.चंद्रशेखर अविनाश आडविरकर यांनी विनापरवाना उत्खनन केले असलेबाबत नमुद केले आहे. सदर प्रकरणी तुम्ही अर्जासोबत स.नं. 114 हि.नं. 8/3 चा सन 1959-60 चे जुने 7/12 चे झेरॉक्स प्रत जोडली आहेत. सध्याचे गावअभिलेख पाहता असे पोटहिस्से दिसून येत नाहीत. तथापि चौकशीवेळी तुम्ही मंडळ अधिकारी यांना स.नं. 114 हि.नं.8/3 ही दाखविलेली मिळकत गावअभिलेख सदरी दाखल नसून ती स.नं. 42/ब/2 क्षेत्र 0.02.0 हे.आर. अशी असून ती मुरलीधर धोंडू आडविरकर वगैरे 2 यांचे



जिल्हाधिकारी कार्यालय
आवक नं.
[illegible]
प्र. लि. नि. उ. जि. [जिल्हाधिकारी]

मालकीची असून सदरचे क्षेत्र बिनशेती आहे. सदर ठिकाणामध्ये घराचे बांधकाम करताना जमिनीचे सपाटीकरण करण्यासाठी उत्खनन केले आहे.

मंडळ अधिकारी यांचा चौकशी अहवाल व गावअभिलेख पाहता आपण तक्रार अर्जामध्ये केलेली तक्रार चुकीची आहे. सबब आपला या कार्यालयाकडील तक्रार अर्ज निकाली ठेवणेत येत आहे.

(शशिकांत जाधव)
तहसीलदार रत्नागिरी

प्रत : मा.जिल्हाधिकारी रत्नागिरी (24x7) नियंत्रण कक्ष यांचेकडे माहितीसाठी सविनय सादर